कि.दि.अपिल क.१६/२०२२
राजु वि. श्रीकृष्ण व इतर

आदेश नि.१५ वर

१. प्रस्तुतचा अर्ज अपिलार्थी क.२ यांनी दिवाणी प्रक्रिया सहिताचे आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केला आहे.

२. त्या अर्जामध्ये त्यानी असे नमुद केले आहे की अपिल दाखल करतांना न्यायालयाच्या नावामध्ये चुक झालेली आहे. त्यामुळे ती त्यांनी दुरूस्त करण्याची परवानगी मागितली आहे.

३. सदर अर्जावर उत्तरार्थी यांच्या विधिज्ञानी त्यांचे म्हणणे दिले. त्यामध्ये त्यांनी योग्य तो आदेश पारीत होण्यास विनंती केलेली आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकुण घेतला.

५. अपिलार्थी क.२ ने अर्जामध्ये नमुद केलेल्या प्रस्तावित दुरूस्तीचा विचार करता ती दुरूस्ती किरकोळ स्वरूपाची म्हणजे न्यायालयाच्या नावाची दुरूस्ती आहे. त्यामुळे खटल्याचा निकाल योग्य रितीने होण्यासाठी सदरचा अर्ज मंजुर करणे आवश्यक ठरते. तसेच प्रस्तावित दुरूस्तीमुळे मुळ अर्जाच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. अर्ज नि.१५ मंजुर करण्यात येत आहे.

२. अपिलार्थी क.२ यांनी अर्जामध्ये न्यायालयाच्या नावाची दुरूस्ती तात्काळ करावी असे आदेशीत करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

स्वा

दि.०४/०५/२०२३

( व्यं.वि.नाशिककर )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१,वाशिम